| | |
|---|---|
| MHAU090013442017 | **रे. मु. नं. १२४/२०१७**<br>**रोहित  वि. विठ्ठल व ईतर** |

**निशाणी नं.०५ वरील आदेश**

१.	वादीने प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकत अ) मौजे ब्रम्हगांव, ता.पैठण, जि.औरंगाबाद येथील जमीन गट नं.३८ मधील क्षेत्र ८० आर शेतजमीन ज्याची चतुःसिमा पुर्वेसः बबनराव यांची जमीन, पश्चिमः लक्ष्मण यांची जमीन, दक्षिणः शशाबाई यांची जमीन, उत्तरः रस्ता.

२.	ब) मौजे ब्रम्हगांव, ता.पैठण, जि.औरंगाबाद येथील जमीन गट नं.४३/१ मधील क्षेत्र १ हेक्टर ३४ आर शेतजमीन ज्याची चतुःसिमा पुर्वेसः बबनराव यांची जमीन, पश्चिमेसः सुभद्राबाई यांची जमीन, दक्षिणेसः शिवाजी तेजिनकर यांची जमीन, उत्तरेसः रमेश यांची जमीन येणे चतुःसिमे आतील मिळकत ही दाव्याची वादग्रस्त मिळकत (ब) आहे.

३.	वादी असे कथन करतो की, सदर मिळकतींचे मुळ मालक प्रतिवादी क्र.१ आहे. प्रतिवादी क्र.१ यास दोन पत्नी असून त्याची पहिली पत्नी शशीकलाबाई मयत असून वादी ही त्याची दुसरी पत्नी आहे. शशीकलाबाईस प्रतिवादी क्र.२ व ३ योगेश व अनिल अशी मुले आहेत व रत्ना हिला रोहित नावाचा मुलगा असून तो अज्ञान आहे. वादग्रस्त् मिळकत प्रतिवादी क्र.१ याची वडिलोपार्जित मिळकत आहे. वादी रत्ना ही प्रतिवादी क्र.१ ची कायदेशीर पत्नी असून तो तिला नांदवित नाही. गट नं.३८ मधील क्षेत्र १ हेक्टर ६० आर जमीनीपैकी ८० आर क्षेत्र जमीन प्रतिवादी क्र.१ त्याचा सख्खा भाउ याला त्याच्या हिश्याची जमीन वाटणीपत्राआधारे वाटून दिली व प्रतिवादी क्र.१ च्या मालकीतील असलेले ८० आर क्षेत्र त्याने त्याचा मुलगा प्रतिवादी क्र.२ योगेश यास वाटून ताब्यात दिली. गट नं.४३/१ मधील क्षेत्र १ हेक्टर ३४ आर जमीनीपैकी २५ आर जमीन प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ च्या नावे बेकायदेशिररित्या केली वउर्वरित ५५ आर जमीन प्रतिवादी क्र.१ ने त्याचा सख्खा भाउ एकनाथ याला त्याच्या हिश्याची जमीन वाटून ताब्यात दिली. तसेच प्रतिवादी

क्र.१ च्या मालकीतील मिळकत क्षेत्र ५५ आर ही प्रतिवादी क्र.१ ने त्याचा मुलगा योगेश याला वाटून ताब्यात दिली. प्रतिवादी क्र.१ने वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र.२ व ४ यास बेकायदेशिरपणे हस्तांतरण केली व आजरोजी त्या मिळकतींची मालकी हक्कात नोंद प्रतिवादी क्र.२ व ४ च्या नावे आहे व वादीची नोंद मालकी हक्कात कोठेही दिसून येत नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर अधिकार आहे. प्रतिवादी क्र.१ याने वडिलोपार्जित मिळकत त्याच्या मुलास वाटणीपत्राआधारे वाटून दिली व काही जमीन दुसऱ्याच्या नावे करुन दिली व वादीने प्रतिवादीकडे त्याच्या हिश्याची मागणी केली असता प्रतिवादीने त्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ व ४यांनी वादग्रस्त मिळकत कोणासही कसल्याही प्रकारे खरेदी विक्री, गहाण–दान व हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादींविरुध्द वादीला मिळावा अशी विनंती वादीने केली.

४. प्रतिवादी नं.१ ने त्यांचे म्हणणे निशानी १६ वर दाखल केले. त्यामध्ये प्रतिवादी नं.१ असे कथन करतो की, वादीचे व त्याचे नाते संबंध तो मान्य करतो व मिळकतीचे वर्णन देखील तो मान्य करतो. वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ यांची वडिलोपार्जित मिळकत असून वाटणी हिस्से न झालेली मिळकत असून सदर मिळकती कौटुंबिक व्यवस्था म्हणून प्रतिवादी नं.२ च्या नावे केली आहे व ती त्याची स्वतंत्र मालकी ताब्यातील मिळकत नसून ती एकत्र कुटुंबाची मिळकत असून वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा त्यात समान हिस्सा आहे. प्रतिवादी नं.१ हा वादग्रस्त मिळकत सर्वांच्या वतीने वहिती करतो. प्रतिवादी नं.१ ची पहिली शशीकलाबाई मयत झाल्यानंतर वादी रत्ना बरोबर लग्न केले व त्याला रोहित नावाचा मुलगा आहे हे देखील तो मान्य करतो. रत्ना ही प्रतिवादी नं.१ सोबत नांदते.प्रतिवादी नं.२ व ३ प्रमाणे वादीचा देखील वादग्रस्त मिळकतीमध्ये हिस्सा आहे. प्रतिवादी नं.१ ने गट नं.४३/१ मधील २५ आर क्षेत्र प्रतिवादी नं.४ यास प्रतिवादी नं.१ च्या वडिलाने मुलीच्या लग्नासाठी काढलेले खाजगी कर्ज देण्यासाठी विक्री केलेल आहे. सदरचा व्यवहार कायदेशीर गरजेपोटी झालेला आहे.

५. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचे म्हणणे निशानी २७ वर दाखल केले. प्रतिवादी क्र.२ व ३ असे कथन करतात की, दावा मिळकतीच्या चतुःसिमा वादीने चुकीच्या नमूद केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीचे मुळ मालक नाही. प्रतिवादी क्र.१ यास शशीकलाबाई ही

एकमेव लग्नाची पत्नी होती. रत्नाबाई ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी व रोहित त्यांचा मुलगा नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना प्रतिवादी क्र.१ ने रत्नाबाई सोबत कधी विवाह केला व त्यांना मुलगा कधी झाला याची माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ च्या नावावर कधीही गट नं.३८ मधील क्षेत्र आलेले नव्हते. प्रतिवादी नं.१ चे वडील धोडींराम यांनी त्यांच्या नावे असलेली जमीन त्यांनी त्यांचा मुलगा म्हणजेच प्रतिवादी नं.१ चा भाउ एकनाथ यास ८० आर व प्रतिवादी नं.२ यास ८० आर जमीन सन २००४ साली वाटणी पत्राआधारे दिलेली असून महसूली दप्तरी फेरफार ६५२ अन्वये, ७/१२ उताऱ्यात प्रतिवादी नं.२ च्या नावे ८० आर क्षेत्राची नोंद झाली आहे. वादीने एकनाथ यास दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले नाही त्यामुळे दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेनेसरी पार्टीची बाधा येते. प्रतिवादी क्र.१ याच्या मालकीतील मिळकत क्षेत्र ५५ आर ही त्याने त्याचा मुलगा योगेश यास वाटून ताब्यात दिली व एकदा वाटण्या झाल्यातर परत वाटणी मागण्याचा प्रश्न येत नाही. वादीचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. प्रतिवादी नं.२ व ३ यांची आई शशीकलाबाई मयत झाली तेव्हा प्रतिवादी क्र.२ व ३ लहान असल्याने ते मामाकडे राहत होते व मामाच्या सांगण्यावरुन दावा मिळकत गट नं.३८ मधील ८० आर जमीन व गट नं.४३/१ मधील ५५ आर जमीन वाटणी पत्राआधारे प्रतिवादी क्र.२ च्या नावे प्रतिवादी क्र.१ ने करुन दिली त्यामुळे प्रतिवादी क्र.२ वाटणीपत्राआधारे जमिनीचे मुळे मालक झाले आहे. प्रतिवादी क्र.१ च्या नावे मौजे ब्रम्हगांव येथे गट क्र.७६ मध्ये ४७ आर जमीन होती. ती जमीन त्यांनी इतर लोकांना विक्री केली त्यांना वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले आहे व त्या मिळकती देखील दाव्यामध्ये वादीने सामील केलेले नाही त्यामुळे दाव्यास हॉच पॉच तत्वाची बाधा येते. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये खर्च करुन त्याची सुपिकता वाढवलेली आहे. वादीने खोटया आशयाचा दावा दाखल केला असून वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी केली.

६. प्रतिवादी क्र.४ याला नोटीस लागूनही तो दाव्यात हजर झाला नाही त्यामुळे त्याच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

७. वादीने जमीन गट नं.३८ मौजे ब्रम्हगव्हान चा ७/१२ उतारा व जमीन गट नं.

४३/१ मौजे ब्रम्हगव्हान चा ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे.

८. वादी दाखल दस्ताऐवजांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी दावा वादीचे बाजुने आहे काय ? | ... होकारार्थी |
| २. | अनुकुलतेचा कल वादीचे बाजुने आहे काय ? | ...होकारार्थी |
| ३. | मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणे**

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता –**

९. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल असलेल्या जमीन गट नं.३८ मौजे ब्रम्हगव्हान चा ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ योगेश याच्या नावावर ८० आर क्षेत्राची नोंद असल्याचे दिसून येते व जमीन गट नं. ४३/१ मौजे ब्रम्हगव्हान चा ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ योगेश याच्या नावावर ५४ आर क्षेत्राची नोंद असल्याचे दिसून येते. या उताऱ्यांचे अवलोकन केले असता सदरच्या मिळकती या वडिलोपार्जित मिळकत असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ ने वादी सोबत लग्न केले असून त्या ला रोहित नावाचा मुलगा असल्याचे त्याने त्याच्या कैफियतमध्ये मान्य केले आहे. प्रतिवादी क्र.१ ची पहिली पत्नी शशीकलाबाई मयत असल्याने त्याने वादी रत्ना हिच्यासोबत लग्न केले व रत्ना पासून प्रतिवादी क्र.१ ला रोहित नावाचा मुलगा झाला. रत्ना ही प्रतिवादी क्र.१ ची कायदेशिर पत्नी असल्याचे दिसून येते व रोहित याचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे. दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ व ४ च्या नावावर हस्तांतरित केल्या. जर प्रतिवादी क्र.२ व ४ यांनी दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री केल्यास वादीचा हिस्सा डावलला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीला तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणे गरजेचे आहे. तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान

होणार आहे.

१०. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने दिसुन येते. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने दिसुन येतो व मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष हे न्यायालय होकारार्थी नोंदवित असल्याने मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. नि. ०५ वरिल अर्ज मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RASHMI KALPESH BAPHANA
Date: 2025.05.06 17:54:37 +0530

(आर. के. बाफना/भळगट)

दि. ०६.०५.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पैठण

## Certificate

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Komal V. Bayas |
| Name of the court | : | Jt. C.J.J.D. Paithan |
| Date of judgment/order | : | 06.05.2025 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 06.05.2025 |
| Judgment/order uploaded on | : | 06.05.2025 |